महाराष्ट्र शासन
समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे १.
ईमेल§ sakalyanpuneest@gmail.com

क्र.सकआ/आस्था/प्र-२/दै.लोकमत/खुलासा/२०२४-२५/पुणे /३८९ दिनांक: २०.२.२०२५.

प्रति,
मा. संपादक,
दै. लोकमत वृत्तपत्र
नागपूर.

**विषय: दि. १६.२.२०२५ रोजीच्या दै.लोकमत वृत्तपत्रात सामाजिक न्याय विभागातील गृहपाल व लिपिक पदेही आऊटसोर्स व्दारे भरणेबाबत प्रसिध्द करण्यात आलेल्या बातमीबाबत...**

**संदर्भ:** दिनांक १६.२.२०२५ रोजीच्या दै. लोकमत वृत्तपत्रात सामाजिक न्याय विभागातील गृहपाल व लिपिक पदेही आऊटसोर्स व्दारे भरणेबाबत प्रसिध्द करण्यात आलेली बातमी.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, दिनांक १६.२.२०२५ रोजीच्या दै. लोकमत वृत्तपत्रात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिनस्त शासकीय वसतिगृहे, शासकीय निवासी शाळा, आणि सामाजिक न्याय भवन इत्यादी ठिकाणची स्वच्छता व इतर कामे बाह्यस्रोता द्वारे उपलब्ध मनुष्यबळाकडून करून घेण्यात येतात. आता विभागाच्या अधिनस्त वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक व गृहपाल या पदांच्या सेवा आऊटसोर्सिंगव्दारे उपलब्ध करुन घेण्यात येणार अशा आशयाची बातमी वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेली आहे.

समाज कल्याण विभागाच्या नियंत्रणाखाली असलेल्या शासकीय इमारतींची सफाई करण्या योग्य बाह्य क्षेत्राची साफसफाईची कामे ही प्रचलित शासन निर्णयानुसार बाह्य स्रोताद्वारे केली जात आहेत. त्यामध्ये साफसफाई, प्लंबिंग, इलेक्ट्रिशियन, कारपेंटर यासारख्या कामांचा समावेश आहे. यापूर्वी सदर कामांसाठी पुरवठादारांचा सेवा पुरवठा कालावधी संपुष्टात आल्यानेच नव्याने ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

समाज कल्याण विभागात सरळसेवेच्या कोटयातील विविध संवर्गातील (गृहपाल, वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक, समाज कल्याण निरीक्षक, उच्चश्रेणी लघुलेखक, निम्नश्रेणी लघुलेखक, लघुटंकलेखक) ही पदे रिक्त असून सदरची भरती प्रक्रिया शासन मान्यतेनुसार टि.सी.एस कंपनीमार्फत भरतीची कार्यवाही सुरु असून माहे मार्च २०२५ मध्ये परीक्षा अयोजित करण्यात

आलेली आहे. तसेच उर्वरीत पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरणेबाबतची कार्यवाही सुरु आहे. सदरील पदांची भरती प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर नियमित कर्मचारी उपलब्ध होणार आहेत.

त्यानंतर रिक्त राहणारी पदेच कंत्राटी पद्धतीने आवश्यकतेनुसार भरण्यात येतील. ती केवळ प्रशासकीय निकड लक्षात घेऊनच कंत्राटी पद्धतीने सदरची पदे तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात येतील.

त्यामुळे ज्या नियमित पदावर आऊटसोर्स द्वारे मनुष्यबळ उपलब्ध करून घेतले जाणार आहेत, ती केवळ तात्पुरती व्यवस्था असून नियमित पदावर आउटसोर्स द्वारे कोणतीही नियुक्ती समाज कल्याण विभाग करणार नाही.

उपरोक्त नमूद केलेप्रमाणे खुलासा आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात यावा.

(ओम प्रकाश बकोरिया)
आयुक्त, समाज कल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

लोकमत

# गृहपाल व लिपिक पदेही 'आऊटसोर्स'द्वारे

## सामाजिक न्याय विभागाचा शासन निर्णय जारी

## नियमित भरती होईपर्यंत उपाययोजना

आनंद डेकाटे
लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर : सामाजिक न्याय विभागात साफसफाईच्या कर्मचाऱ्यांनंतर आता वसतिगृहातील गृहपाल व वरिष्ठ आणि कनिष्ठ लिपिकांची पदेही आऊटसोर्सद्वारे भरले जाणार आहेत. सामाजिक न्याय विभागाद्वारे यासंदर्भात शासन आदेश जारी करण्यात आला आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रीय कार्यालये, शासकीय वसतिगृहे, शासकीय निवासी शाळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, आदी कार्यालयांतील साफसफाईच्या कामांसाठी लागणारे मनुष्यबळ हे अगोदरच आऊटसोर्सद्वारे उपलब्ध करून दिले जात आहे. आता विभागाच्या अधिनस्त कार्यालयीन कामासाठी शिपाई, चौकीदार व महिला काळजीवाहक तसेच विभागांतर्गत सद्य:स्थितीत रिक्त असलेले वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक व गृहपाल या पदांच्या सेवा नियमित भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आऊटसोर्स करण्यात येणार आहे. शिपाई, चौकीदार, लिपिक, महिला काळजीवाहू, गृहपाल या सेवा बाह्ययंत्रणेकडून उपलब्ध करून घेण्यासाठी सेवा पुरवठादारास सेवा शुल्क अदा करणे या तत्त्वावर ई-निविदा प्रक्रिया राबवून सेवा उपलब्ध करून घेण्याची कार्यवाही आयुक्त स्तरावर करण्यात यावी, असे या शासन आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

### ३३ जिल्ह्यांतील कार्यालयांमध्ये भरती

[illegible]

> "सरकार सर्वच आऊटसोर्स करण्याच्या मागे लागले आहे. वसतिगृहाच्या गृहपाल हे अतिशय महत्त्वाचे आणि जबाबदारीचे पद आहे. आर्थिक व्यवहाराचे अधिकारही त्यांना असतात. अशा पदाच्या जागा आऊटसोर्सद्वारे भरणे हे अतिशय धोकादायक ठरेल.
>
> अतुल खोब्रागडे, युवा ग्रॅज्युएट फोरम

लोकमत

# आउटसोर्स ही तात्पुरती व्यवस्था

लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर : समाजकल्याण विभागातील नियमित पदांवर आउटसोर्सद्वारे मनुष्यबळ उपलब्ध करून घेतले जाणार आहे. ती केवळ तात्पुरती व्यवस्था असून नियमित पदांवर आऊटसोर्सद्वारे कोणतीही नियुक्ती होणार नाही, असे समाजकल्याण विभागाचे आयुक्त ओमप्रकाश बकोरिया यांनी म्हटले आहे.

समाजकल्याण विभागात सरळसेच्या कोट्यातील विविध संवर्गातील गृहपाल, वरिष्ठ समाजकल्याण निरीक्षक, समाज कल्याण निरीक्षक, उच्चश्रेणी लघुलेखक, निम्मश्रेणी लघुलेखक, लघुटंकलेखक ही पदे रिक्त आहेत. ही रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. यारिक्त पदांसाठी मार्च महिन्यात परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. तर उर्वरित पदे लोकसेवा आयोगामार्फत भरण्याची कार्यवाही सुरू आहे. भरती प्रक्रिया पूर्ण झाल्यावर नियमित कर्मचारी उपलब्ध होतील. रिक्त पदेच कंत्राटी पद्धतीने आवश्यकतेनुसार भरण्यात येतील.

Hello Nagpur
Page No. 2 Feb 25, 2025
Powered by: erelego.com

ail/u/0/?tab=rm&ogbl#inbox/FMfcgzQZVJvWWFrwrqTmQPzBpVdcfVzr?projector=1